श्री.राहुल किवंडे, तत्कालीन सहाय्यक विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक) यांच्या निलंबनाबाबत..

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

शासन आदेश क्रमांक:- मुविनि-२०२६/प्र.क्र.११३/ऊर्जा-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
तिसरा मजला,मंत्रालय मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १४ ऑगस्ट, २०२६

वाचा:- विद्युत निरीक्षक,नाशिक यांचा चौकशी अहवाल, जा.क्रमांक.विनिना/तां.शा./७०९/२०२६, दि.०२.०६.२०२६.

आदेश:-

ज्याअर्थी, पारा अव्हेन्यू सोसायटी, राहुलनगर, पवारवाडी, पंचक, जेलरोड नाशिक या ठिकाणी दि.१९.०४.२०२६ रोजी श्रीमती. गौरी अभिजित मकवान यांचेसह ३ बालकांचा उद्वाहनाचे रोप तुटल्याने उद्वाहन थेट खाली कोसळून अप्राणांतिक अपघात घडला आहे. सदर अपघातात श्रीमती.गौरी मकवान यांच्यासह ३ बालकांना गंभीर दुखापत झाली आहे.

०२. ज्याअर्थी, श्री. राहुल किवंडे, तत्कालीन सहाय्यक विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), चेंबुर, मुंबई यांनी दि.१६.१०.२०२० ते दि.२२.०५.२०२५ या कालावधीत सहाय्यक विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), चेंबुर, मुंबई या कार्यालयात कार्यरत असतांना, त्यांनी नाशिक येथील पारा अव्हेन्यू सोसायटीमधील उद्वाहन तपासणी केली आहे. श्री.किवंडे यांनी सदर सोसायटीतील उद्वाहन तपासणी करतांना उद्वाहनाच्या ओवर स्पीड गवर्नरची (OSG) इलेक्ट्रिकल सेफ्टी यंत्रणा लावलेली नसतांना व यांत्रिकी सेफ्टी यंत्रणा कार्यान्वित नसतांना उद्वाहनातील यांत्रिकी चूकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. तसेच, उद्वाहनाच्या कंट्रोल पॅनलमध्ये स्वतंत्र Contractor लावण्यात आलेले नसतांना व उद्वाहनाच्या पिटमध्ये बफर व बफरस्प्रिंग लावलेली नसतांना उद्वाहन सुरक्षिततेबाबत कोणतीही शहानिशा व पडताळणी केली नसल्याचे दिसून येते. श्री.किवंडे यांनी सदर सोसायटीतील उद्वाहन सुरक्षिततेबाबत अनेक तांत्रिक त्रुटी असतांनादेखील उद्वाहन उभारणी व चालविण्याचा परवाना देण्यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयास चुकीची माहिती सादर करून महाराष्ट्र उद्वाहन नियमांमधील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. तसेच, पारा अव्हेन्यू सोसायटी, राहुलनगर, पवारवाडी, पंचक, जेलरोड नाशिक येथे झालेला उद्वाहन अपघात हा चुकीचे उद्वाहन निरीक्षण, असुरक्षित उद्वाहन संचमांडणी यामुळे झाला असल्याचे निष्पन्न होत आहे.

०३. ज्याअर्थी, पारा अव्हेन्यू सोसायटी, राहुलनगर, पवारवाडी, पंचक, जेलरोड नाशिक या सोसायटीला उद्वाहन ठेकेदार यांनी सदर सोसायटीमध्ये उद्वाहन उभारणीमधील साहित्य व यांत्रिकी उपकरणे निकृष्ट दर्जाचे लावलेले असल्याचे विद्युत निरीक्षक, नाशिक यांच्या दि.०२.०६.२०२६ रोजीच्या चौकशी अहवालावरून निष्पन्न होत आहे. सदर उद्वाहन उभारणी करण्यापुर्वी श्री. किवंडे यांच्यामार्फत उद्वाहन उभारणीमधील साहित्य व यांत्रिकी उपकरणे निकृष्ट दर्जाचे असून सुध्दा दुर्लक्ष करण्यात आले आहे. श्री. किवंडे यांनी उद्वाहन सुरक्षिततेबाबत कोणतीही खातरजमा न करता व उद्वाहन साहित्यातील त्रुटींकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करून उद्वाहन योग्य स्थितीत असल्याचे दर्शवून, सदर उद्वाहन उभारणी व चालविण्याचा परवाना देण्याबाबतचा चुकीचा अहवाल विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक) व मुख्य विद्युत निरीक्षक यांना सादर केला आहे.

तसेच, सदर सोसायटीमध्ये उद्वाहन उभारणी करतांना श्री.राहुल किवंडे यांच्यामार्फत महाराष्ट्र उद्वाहन अधिनियम,१९३९ मधील नियमांच्या अनुषंगाने योग्यप्रकारे कर्तव्य पार न पाडता उद्वाहन नियमांचा भंग झालेला आहे. सदर सोसायटीमध्ये उद्वाहनाची उभारणी करून १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला असतांना उद्वाहन अपघात होणे ही बाब मानवी दृष्टीकोनातून अतिशय गंभीर आहे. उद्वाहन हे जनतेच्या सुरक्षितेशी निगडित आहे. त्यामुळे यासंदर्भातील नियमांचे उल्लंघन ही अतिशय गंभीर बाब आहे.

०४. ज्याअर्थी, श्री. राहुल किवंडे, तत्कालीन सहाय्यक विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक) या पदावर कार्यरत असतांना शासकीय पदाचा दुरुपयोग करून व कर्तव्यात कसूर करून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्र. ३ (एक) नितांत सचोटी आणि (दोन) कर्तव्यपरायणतेचा भंग केला असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध होत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील (भाग-२) नियम ४ मध्ये निलंबन (१) (अ) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजिले असेल किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल अशा बाबतीत निलंबाधीन ठेवू शकेल.

०५. त्याअर्थी, आता, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील (भाग-२) नियम ४ च्या उप-नियम (१) च्या खंड (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून याद्वारे, श्री.राहुल किवंडे यांना तत्कालीन सहाय्यक विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), चेंबुर, मुंबई या पदावर कार्यरत असतांना केलेल्या अनियमिततेबाबत या **आदेशाच्या दिनांकापासून** सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येत आहे आणि पुढील आदेश काढले जाईपर्यंत ते निलंबित राहतील.

०६. पुढे असेही आदेश देण्यात येत आहेत की, हा आदेश अंमलात राहील तोपर्यंत श्री.राहुल किवंडे यांचे मुख्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई हे राहील. श्री.राहुल किवंडे यांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय आपले मुख्यालय सोडता येणार नाही.

०७. पुढे असेही आदेश देण्यात येत आहेत की, हे आदेश अस्तित्वात राहतील त्या कालावधीसाठी श्री.राहुल किवंडे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व

सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,१९८१ च्या नियम ६८ (१) (ए) अन्वये निर्वाहभत्ता व त्यावरील इतर भत्ते देय राहतील.

०८. श्री.राहुल किवंडे यांना निलंबन कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम-१६ मधील तरतूदीनुसार कोणतीही खाजगी नोकरी स्विकारता येणार नाही अथवा कोणताही व्यवसाय करता येणार नाही. जर श्री.राहुल किवंडे यांनी खाजगी नोकरी स्विकारली अथवा काही व्यवसाय केला तर, गैरवर्तणूकीबाबत त्यांना दोषी समजण्यात येऊन, त्याप्रमाणे त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यास ते पात्र होतील आणि अशा परिस्थितीत ते निर्वाहभत्ता मिळण्याचा हक्क गमावतील

०९. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१४१८२०२८६८५३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=F772EE0A28E62B88C18153A71C018DB8CA85BB88519F9C9732879CD03483D005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7DFB83DE598E6DA39C6F3759E6943FB264003EB8BAFCBA24102A6D87367C3EA1, cn=AVINASH RAJESH ATKAD
Date: 2026.08.14 18:21:26 +05'30'

(अविनाश रा.आतकड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. राहुल किवंडे, तत्कालीन सहाय्यक विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), चेंबुर, मुंबई. (द्वारा- मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई.)

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरील आदेश श्री. राहुल किवंडे, तत्कालीन सहाय्यक विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), चेंबुर, मुंबई यांना खास दुतामार्फत बजावून, त्यांची दिनांकित पोच पावती शासनास कृपया **तात्काळ** सादर करावी.
४. सह सचिव (कार्यासन-११), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सह सचिव (ऊर्जा-१), उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, मुंबई.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
८. निवडनस्ती (ऊर्जा-१).